महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, गट-ब महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी

**धारिका क्रमांक : १५(२)(१८२)/७४०/आठ**

**जाहिरात क्रमांक : ५८/२०१७**

**आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्या आस्थापनेवरील अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, गट-ब महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी** या एका पदाच्या भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- १**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि. मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | – | -- | -- | – | -- | -- | – | -- | १ | १ |
| **अ) महिला** (३०%) | -- | – | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **ब) खेळाडू** (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **क) अपंग** (३%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधीत विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन पत्र, अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. उसाअ-२०१५/प्र.क्र.२२५/का-१, दिनांक २८ जून, २०१७ च्या पत्रानुसार प्रस्तुत पदासाठी अपंग उमेदवार अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**३. वेतनश्रेणी - रु.** ९,३०० – ३४,८०० + ग्रेड पे रु.४,३००/-

**४. पात्रता विषयक अटी**

**४.१ वय:-**

(१) **दिनांक १ डिसेंबर, २०१७** रोजी सर्व उमेदवारांकरिता **३८** वर्षापेक्षा जास्त नसावे.

(२) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

(३) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

(४) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अपवादात्मक अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पूरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

**४.२ शैक्षणिक अर्हता:-**A candidate must,

a) possess a degree of a statutory University with Urdu as a special subject.

b) have proficiency in writing Urdu articles and correspondence.

c) have adequate knowledge of Marathi language.

**४.३ परिविक्षाधीन कालावधी २ वर्षे राहील.**

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास

मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

७. **कर्तव्ये व जबाबदाऱ्या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. **शुल्क :**

८.१ अमागास - रु.**३७४**/-

**“ मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता ( उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता इत्यादी ) केल्यासच असे उमेदवार अराखीव पदांवर शिफारशिसाठी पात्र होऊ शकतील.”**

९. **अर्ज करण्याची पध्दत -**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १ ऑगस्ट, २०१७ ते दिनांक २१ ऑगस्ट, २०१७** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा.

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “माझे खाते” या लिंक वर क्लिक करावे.

(२)“माझे खाते” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) ‘Pay Now’ या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईल पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** चाळणी/लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकाराले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**१३.** महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्य नियमावली २०१४ तील नियम ९(viii) नुसार चाळणी परीक्षा घेतल्यास, चाळणी/लेखी परीक्षेचे व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**१४.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रोनिक साधने/ संपर्क साधने आणण्यास / वापरण्यास किंवा बाळगण्यास सक्त मनाई आहे.

**१५**. विहित पद्धतीने अर्ज सादर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१६**. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत** भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**राजन बा. खोत**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १ ऑगस्ट, २०१७**